गोदातीर दि 15/09/23

# पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जिल्ह्यातील १४ गुन्हेगारांना केले तडीपार

**नांदेड-** तोंडावर आलेल्या गणेशोत्सव यासह अन्य महत्त्वाच्या सणांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जिल्ह्यातील चौदा जणांना हद्दपार केले आहे. यातील काही जण दोन वर्ष, एक वर्ष आणि सहा महिने जिल्ह्यातून बाहेर राहणार आहेत.

एकदाच १४ जणांना हद्दपार करण्याची जिल्ह्यातील ही पहिलीच वेळ आहे. यात बंदुकीने स्वतःवर गोळीबार करून घेणाऱ्या एका महिलेचाही समावेश आहे. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी गंभीर आरोप असलेल्या १४ गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई केली आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी गुन्हेगारी संपवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार असलेले व गोळीबार, दरोडा, मारामारी यासारखे गंभीर गुन्हे असलेल्या जिल्ह्यातील सहा पोलीस स्थानकांच्या हद्दीतील गुन्हे दाखल असलेल्या एकूण १४ जणांना कोकाटे यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा ५५ प्रमाणे कारवाई करून जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. यामध्ये देगलूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आकाश देशमुख (वय ३२, रा. संघर्षनगर, देगलूर) तर सुगतकुमार केरुरकर (वय २९, रा. नागसेन चौक, देगलूर), लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राम जाधव (वय २२), तुषार उर्फ भुऱ्या मधुकर माने (वय २४) तसेच रितेश उर्फ रित्या दिलीप माने (वय २२, सर्व जण रा. सोमेश कॉलनी, नांदेड), सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे दाखल असलेले रोहन राजू ससाणे (वय २१, रा. विष्णुपुरी), गणेश भुजंग मोरे (रा. शाहूनगर, नांदेड), मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद असलेले चैतन्य उर्फ अनिल सटवाजी जुडेवार (वय २१, रा. गणेशनगर, मुदखेड), नितीन चुडेवार (वय १९, रा.गणेशनगर, मुदखेड), कृष्णा उर्फ नाथा बालाजी बहिरवाड (वय २५, रा. मुदखेड), उमरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मारुती कावळे (वय ३४, रा. इळेगाव ता. उमरी), मोहन पवार (वय



२८, रा. इळेगाव, ता. उमरी) तर शहरातील इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सविता बाबुराव गायकवाड (वय ४४, रा. शक्तीनगर, इतवारा, नांदेड), किरण सुरेश मोरे (वय २६, रा. धनेगाव) या चौदा जणांना जिल्ह्यातून हद्दपारची कारवाई केली. त्यांना जिल्ह्याबाहेर सोडण्यात आले आहे.

**(पान ३ वर...)**